आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२८ मे २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात पावसाचा जोर कायम/ पावसामुळे अनेक ठिकाणी मालमत्तेचं नुकसान, आठ जणांचा मृत्यू

- गेल्या आर्थिक वर्षात देशात ८१ अब्ज अमेरिकन डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक झाल्याची वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाची माहिती

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या पर्यटकांच्या स्मरणार्थ  जम्मू काश्मीरमधे स्मारक उभारण्याची मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची घोषणा

**आणि**

- भंडाऱ्यामधे कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रात १२९ मेट्रिक टन बोगस खतांचा साठा जप्त

**<><><><><>**

राज्यात गेले तीन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झालं आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पावसामुळे आठ जणांचा मृत्यू झाला आहे. पुण्यात तीन, जालन्यात  दोन तर मुंबई, रायगड आणि अहिल्यानगर मध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहेत . मृतांच्या कुटुंबियांना तात्काळ मदत देण्याचे आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या  बैठकीत दिले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्रातील पावसाळ्याची परिस्थिती अजूनही गंभीर आहे. लातूरमध्ये तीन दिवसांत सरासरी २०६ मिलीमिटर पाऊस पडला, तर अहिल्यानगरमध्ये २०१पूर्णांक २ मिलीमीटर पाऊस पडला. पुरामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे.

महाराष्ट्रात गेल्या २४ तासांत काही ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे.

**अकोल्यात** काल सुमारे १३० मिलीमिटर पावसाची नोंद झाली. मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले होते. त्यामुळे अनेक घरात, पाणी शिरलं. साहित्याचे नुकसान झाले. चार ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहनांचं नुकसान झालं. शहरात काही भागांत वीज पुरवठा खंडित झाला. पावसामुळे फळबागा, ज्वारी, कांद्यासह अन्य पिकांचं नुकसान झालं आहे.

**नांदेड**मध्ये हदगाव तालुक्यात वरवटी इथं काल ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. पावसामुळे आलेल्या पुरात ३ जण वाहून गेले.

**अहिल्यानगर**मध्ये वालुंबा नदीजवळ अडकलेल्या १५ रहिवाशांना स्थानिक आपत्ती पथकांनी वाचवलं आहे.

**धुळे जिल्ह्यात** आज जोरदार पाऊस झाला आहे. पावसामुळे काही सखल भागात पाणी साचले आहे. हवामान विभागाने जिल्ह्यात  पुढील तीन तासांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात पावसाचा जोर आज सकाळपासून वाढला आहे. जिल्ह्याला आज रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान राज्यात काही ठिकाणी मात्र पावसानं विश्रांती घेतली आहे.

**रत्नागिरीत** काल रात्रीपासून पावसाचा जोर कमी झाला आहे. जिल्ह्यात वातावरण ढगाळ असून आज आठ दिवसांनी सूर्यदर्शन झालं. लांज्यात गेल्या २४ तासांमध्ये सर्वाधिक  ११८ मिलिमीटर पाऊस पडला.

**मुंबई** आणि उपनगरातही पावसानं आज विश्रांती घेतली आहे.

**<><><><><>**

देशभरात यावर्षी नैऋत्य मोसमी पाऊस सामान्य प्रमाणापेक्षा जास्त पडण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. देशात यंदा नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन लवकर झालं आहे. पुढच्या महिन्यात वायव्य भारतात काही भागांमध्ये तसंच मध्य आणि पूर्व भारतात उष्णतेच्या लाटेची तीव्रता कमी

होण्याची शक्यता आहे. कर्नाटकचा किनारी भाग, केरळ, माहे, नागालँड, मणिपूर, मिझोरम आणि त्रिपुरा इथं काही ठिकाणी पुढचे दोन दिवस मुसळधार पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. दरम्यान, पश्चिम राजस्थानमध्ये उष्णतेच्या लाटेसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या ६५ व्या आणि ६६ व्या दीक्षांत समारंभाला ते उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

एसटी महामंडळाच्या ठाणे-नागपूर दरम्यान चालवण्यात येणाऱ्या 'स्मार्ट बस'मध्ये बसवण्यात आलेल्या आयटी सुरक्षा प्रणालीची पाहणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाणे इथं केली. राज्य परिवहन महामंडळाच्या बस मधून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आहे, त्यासाठी ‘एआय’ तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली स्मार्ट बसगाड्यांमधे लावण्यात येणार असल्यानं या नवीन बसगाड्या प्रवासाकरिता अधिक सुरक्षित असतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, एसटीचे अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

माळढोक पक्ष्याच्या प्रजातीतला तणमोर पक्षी रत्नागिरी जिल्ह्यातल्या कातळसड्यावर आढळून आला आहे. हा अतिशय दुर्मिळ पक्षी समजला जातो. तणमोर हा पक्षी रत्नागिरीत पहिल्यांदाच आढळल्याचं पक्षी निरीक्षक सांगतात. याबद्दल अधिक माहिती देत आहेत, आमचे प्रतिनिधी अनिकेत कोनकर….

**होल्ड बाईट कोनकर**

**<><><><><>**

देशात गेल्या आर्थिक वर्षात ८१ अब्ज अमेरिकन डॉलर्सची थेट परकीय गुंतवणूक झाली आहे. आधीच्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ती १४ टक्के अधिक आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनानुसार, यापैकी १९ टक्के गुंतवणूक सेवा क्षेत्रात झाली. तर संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर क्षेत्राला १६ टक्के आणि व्यापार क्षेत्राला ८ टक्के लाभ झाला असल्याचं नमूद केलं आहे. सरकारनं परकीय गुंतवणूकदारांसाठी अनुकूल धोरण लागू केलं आहे, याअंतर्गत बहुतांश क्षेत्रं १०० टक्के एफडीआयसाठी खुली आहेत.

**<><><><>**

पहलगामधल्या दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या  २६ पर्यटकांच्या स्मरणार्थ पहलगाम इथं स्मारक उभारण्याची घोषणा जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी केली आहे. पहलगाम इथं काल  झालेल्या जम्मू-काश्मीर मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर, जम्मू-काश्मीर सार्वजनिक बांधकाम विभागाला स्मारकाचं काम सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**<><><><>**

भंडाऱ्यामध्ये  लाखनी इथं कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रात सुमारे  १२९  मेट्रिक टन बोगस मिश्र खतांचा साठा आढळून आला आहे. मिश्र खताच्या नमुन्याची अमरावतीमधल्या खत नियंत्रण प्रयोगशाळेत तपासणी केली असता नमुने अप्रमाणित ठरले आहेत. विशेष म्हणजे संबंधित खत उत्पादन कंपनी आणि वितरक तसेच विक्रेत्यांकडे महाराष्ट्र राज्यातील खत उत्पादन आणि विक्री संबंधीचे कोणतेही परवाने नसल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे.

**<><><><>**

जामखेड तालुक्यातील मौजे चौंडी इथल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या विकासासासाठी ६८१ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मान्यता मिळाली  आहे.  विकास आराखड्यातील सर्व कामे ३१ मे २०२८ पर्यंत

पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे यंदा त्रिशताब्दी जन्मवर्ष असून त्यानिमित्ताने चौंडी इथं ६ मे रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार नियोजन विभागाने आज शासननिर्णय जारी केला.

**<><><><><>**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते, पालघरचे माजी खासदार लहानु कोम यांचं आज पहाटे अल्पशा आजारानं निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. लहानु कोम यांनी १९५९ पासून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. आदिवासी, शेतकऱ्यांचं संघटन बांधण्याचं काम त्यांनी अनेक वर्षे केलं. आदिवासी प्रगती मंडळाचं अध्यक्षपदही त्यांनी अनेक वर्षं भूषवलं. कोम यांच्या पार्थिवावर उद्या तलासरी इथं अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून सिक्कीम, पश्चिम बंगाल, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. सिक्कीम दौऱ्यादरम्यान, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी "सिक्कीम ५०: या कार्यक्रमात सहभागी होतील. तसंच राज्यातल्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही करतील. त्यानंतर पश्चिम बंगालमधल्या अलीपुरद्वार आणि कूचबिहार जिल्ह्यांमध्ये शहर गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी प्रधानमंत्री मोदी करणार आहेत. तसंच बिहारमध्ये पाटणा विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीचं उद्घाटन, करकट इथं ४८ हजार ५२० कोटींहून अधिक किमतीच्या आणि कानपूर नगरमध्ये सुमारे २० हजार ९०० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी प्रधानमंत्री करणार आहेत.

**//<><><><><>//**